॥ ॐ ॥

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यवृत्त

जून २०२०


२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११ ०११.

(कार्यालय दूरध्वनी) : ९०११३८६३८६ भ्रमणध्वनी : ९८२२६७५७६०

Email : wardhinee@gmail.com

Website : http://www.swaroopwardhinee.org




## ‘स्व’-रूपवर्धिनीच्या इतिहासातील पहिले Online शिबीर

*Innovation*

*Creation*

*Motivation*

## 'स्व'- रूपवर्धिनीच्या इतिहासातील पहिले ऑनलाईन शिबिर

'स्व'- रूपवर्धिनीचे शिबीर म्हणजे उत्साह, आनंद आणि सहवासातून फुलत जाणारी मैत्री. वर्धिनीच्या मनुष्य जडणघडणीच्या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा. या शिबिराची युवा गट आणि वर्धक-वर्धिका सगळेजण मनापासून वाट बघत असतात. दरवर्षी शिबीर स्थान वेगळे, विषय वेगळा त्यामुळे नवीन परिसराची मुलांना ओळख होते, नवीन माहिती मिळते. युवागटाला त्यांच्यातल्या सुप्त गुणांना चालना देता येते. सर्व शाखांचे एकत्रित शिबीर असल्याने 'संघटन' या शब्दाची खरी व्याख्या अनुभवता येते. पण यावर्षी कोरोनाच्या बंधनामुळे ह्या शिबिराची तांत्रिक व्याख्या अनुभवता आली. युवकगटाची कल्पकता बहरून आली. शिबिरातील सहभागाचे वर्तुळ विस्तारले. पुणे शहराच्या बाहेरील मुलामुलींना सुद्धा हे शिबीर स्मार्ट फोनच्या सहाय्याने अनुभवता आले. मुलांना व्हिडिओ बनवणे, ऑनलाईन मीटिंग करणे, कृतीयुक्त उपक्रमात सहभागी होणे, अशा अनेक तंत्रांची माहिती मिळाली आणि त्याचा मुलांनी सुरेख वापरही केला, त्यांच्या उस्फुर्त प्रतिसादामुळे ही शिबिरे यशस्वी ठरली. दिनांक २३ मे ते ३१ मे २०२० या कालावधीत संपन्न झालेल्या विविध शिबिरांमध्ये सुमारे १३०० ते १४०० मुलांनी सहभाग घेतला. प्रत्येक शाखेने केलेली उत्तम प्रचार प्रसिद्धी, तगडी संपर्क रचना, नाविन्यपूर्ण उपक्रमांची मेजवानी आणि वर्धिनीचे वर्धिनीपण पोहोचवणारी प्रेरणा सत्रे यामुळे शिबिरांचा हा अनुभव कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवणारा आणि सदैव स्मरणात राहील असा ठरला. विविध ठिकाणी सुरु असणाऱ्या शिबिरांमध्ये प्रेरणा जागरण आणि मूल्यवर्धन यावर आधारित झालेली सत्रे पुढीलप्रमाणे :

| वक्ते | कथा / विषय |
|---|---|
| श्री.ज्ञानेश पुरंदरे | कथा - देव आणि राक्षस |
| | विषय : आई |
| | विषय : छत्रपती शिवरायांचे बालपण |
| श्री.निलेश धायरकर | कथा - आईचे डोळे. |
| | विषय : मोबाईल शाप की वरदान |
| श्रीमती पुष्पाताई नडे | विषय :स्व'- रुपवर्धिनी परिचय |
| श्री. दिग्पाल लांजेकर | कथा - शिवरायांच्या जीवनातील प्रसंग. |
| श्री. आकाश चौकसे | कथा - श्रीमंती आणि समृद्धी |
| श्री. सचिन सनगरे | विषय - डॉ. कलाम |
| श्री. सौगंध देशमुख | कथाकथन |
| सौ. कोमल धायरकर | कथा : खरी मैत्री |

## राजर्षी शाहू शाखा

सर्वांग सुंदर व्यायाम - सर्व मुलांना सकाळी लवकर उठण्याची सवय लागावी आणि शारीरिक सुदृढता वाढावी म्हणून रोज सकाळी व्यायाम आणि योगासन यांनी दिवसाची सुरुवात होई.

'केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे' या उक्ती प्रमाणे शिबिरात सहभागी झालेल्या सर्व मुलांना दिवसभरात २-३ तासांच्या कृतिसत्रात रमवण्याचा प्रयत्न केला. घरातील साहित्यांचा वापर करता येईल अशा कृतिसत्रांचा समावेश करण्यात आला होता. सर्व कृतिसत्रांमधून मुलांची कल्पकता आणि नाविन्यता दिसून आली.

या शिबिरात पहिल्यांदा शाखेतील मुलांच्या व्यतिरिक्त इतर मुलं सहभागी झाली होती, एकूण संख्या ४५. मुलांचे ३ गटात विभाजन करण्यात आले. ३ गट वेगवेगळे युवक सांभाळत होते. मुलांचा सहभाग, त्यांनी वापरलेल्या कल्पना, नाविन्यता या मुद्द्यांच्या आधारे ३ गटातून प्रत्येकी ३ क्रमांक काढण्यात आले. या शिबिरात झालेले सर्व उपक्रम मुलांना खूप आवडले. असे शिबिर पुन्हा एकदा आयोजित करा अशी मागणी पालकांकडून करण्यात आली आहे. एकूणच हे शिबीर यशस्वी ठरले.





## राजश्री शाहू महाराज शाखा







## स्वामी दयानंद सरस्वती शाखा

शिबिराची सुरुवात एका नाविन्यपूर्ण उपक्रमाने झाली. यामध्ये सर्व मुलांनी आपल्या नावाची वेगवेगळ्या प्रकारच्या कल्पना वापरून डिझाइन तयार करुन त्याचे फोटो ग्रुपवर पाठवले. परिचय सत्रात प्रत्येकाने स्वतःची ओळख व्हिडिओ मार्फत करून दिली.

यानंतर ५ दिवसांच्या या शिबिरात अनेक उपक्रम घेण्यात आले. त्यामध्ये मुलांचा शब्दसंग्रह वाढावा यासाठी अक्षरांची गंमत जंमत, निरीक्षण क्षमता वाढवण्यासाठी चित्र निरीक्षण, माझ्या कल्पनेतील smart city स्पर्धा, पाककला स्पर्धा, फॅमिली कट्टा, टॅटू व मेहेंदी स्पर्धा, या आपत्कालीन परिस्थितीमध्ये स्वतःचा जीव धोक्यात घालून आपल्यासाठी लढणाऱ्या पोलिस, डॉक्टर, सफाई कामगार, सरकारी कर्मचारी, शेतकरी अशा अनेक जणांना चित्राच्या रुपात मानवंदना, स्वा. सावरकर यांच्या जयंतीनिमित्त निबंध स्पर्धा, व्हेजिटेबल पेंटिंग स्पर्धा अशा अनेक उपक्रमांचा समावेश होता. सामान्य ज्ञानावर आधारित ऑनलाईन प्रश्नमंजुषा घेण्यात आली. यात मुलांनी Google Form मार्फत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. या स्पर्धेला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.











## स्वामी सुबोधानंद शाखा

■ **वेशभूषा स्पर्धा :-** या स्पर्धेमध्ये मुलांनी घरात उपलब्ध साहित्याचा वापर करून विविध वेशभूषा कराव्यात अशी सूचना सांगितली होती. यामध्ये शेतकरी, गोरिला, कोरोना फायटर अशा वेशभूषा करून मुलांनी उत्तम प्रतिसाद नोंदवला.

■ **फेस पेंटिंग स्पर्धा :-** या स्पर्धेमध्ये मुलांना आपल्या किंवा दुसऱ्याच्या चेहऱ्यावर चित्र काढायचे होते व त्याचे फोटो त्या गटावर पाठवायचे होते.

■ **विविध गुणदर्शन :-** मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी ही स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये मुलांनी आपल्या कलेचे सादरीकरण व्हिडीओ आणि फोटोंच्या माध्यमातून केले. उदा. बुद्धिबळाचे शॉर्टकट्स, कागदी वस्तू, बाटलीवर चित्र काढणे

■ **टाकाऊ पासून टिकाऊ :-** या स्पर्धेमध्ये मुलांनी टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू तयार केल्या. कागदांपासून बंगला बनवणे, काडेपेटीच्या डब्यांची शोकेस इ. वस्तू तयार केल्या. शिबिराच्या काळात दररोज पद्य सत्र घेण्यात आले. पद्य सत्राची वेळ ३ ते ५ अशी होती. यामध्ये आपण त्या पद्याची PDF आणि व्हिडिओ बनवून तो शिबीर गटावर पाठवायचो. यात 'हिंदुस्थान माझा देश', 'आम्ही बी घडलो', 'रामदूत हनुमंता', 'पूर्ण विजय संकल्प हमारा', 'जय भवानी जय शिवराय' अशा अनेक पद्यांची ओळख मुलांना झाली.

■ **फॅमिली टाईम :-** मुलांसाठी अनेक उपक्रम सुरु असले तरी पालकांना यात सहभागी करून घेणे, त्यांच्यापर्यंत वर्धिनी पोहोचवणे आणि त्यांचा विश्वास संपादन करणे या हेतूने संपूर्ण कुटुंबासाठी टी टाईम विथ फॅमिली, हातांच्या ठश्यांपासून फॅमिली पेंटिंग, फॅमिली स्लोगन, फॅमिली ट्री असे अनेक उपक्रम घेण्यात आले.




## भगिनी निवेदिता शाखा, समर्थ रामकृष्ण शाखा, कसबा वस्ती विभाग

**एकूण सत्रे :- २०**
व्यायामसत्रे ४, कृतीसत्रे ११, प्रेरणासत्रे ५

■ **शारीरिक जडणघडण** - हात, मान, पाय, कंबर फिरवणे यासारखे साधे व्यायाम प्रकार, ताडासन, पश्चिमोत्तानासन, चक्रासन, त्रिकोणासन, वृक्षासन ही आसने आणि ध्यान, प्राणायाम शिकवले.

■ **घर सुंदर मी करणार** - घर स्वच्छ झाडणे, पुसणे, कपड्यांच्या घड्या घालणे, घरकामात आईला मदत करणे यातून मुलांना स्वच्छतेचे आणि स्वयंशिस्तीचे मूल्य समजले.

■ **ओळख माझ्या परिसराची** - या कृतीमध्ये मुलांनी घराच्या आसपास असणारी मंदिरे, शाळा, रुग्णालये, पोलिस चौक्या, बसथांबे, चौक, प्रसिद्ध ठिकाणे,कोणता रस्ता कुठे मिळतो अशी माहिती दिली. यातून मुलांना परिसराची ओळख झाली.

■ **थ्री डी पेंटिंग** - या सत्रात मुलांना थ्री डी चित्र संकल्पना माहित झाली. मुलांनी काढलेल्या वस्तूचे चित्र हे चित्र नसून ती वस्तूच आहे असे भासत होते. चित्रकलेची अनोखी गंमत यातून मुलांनी अनुभवली.

■ **माझी ओळख, माझे ओळखपत्र** - मुलांनी अनोख्या पद्धतीने ओळखपत्र बनवले. मला काय आवडतं, माझे छंद काय, मला मोठे होऊन काय करायचे आहे अशी माहिती मुलांनी ओळखपत्रात भरली. या कृतीमुळे स्वतःची ओळख होण्यास मदत झाली.

■ **चाय पे चर्चा** - मुलांनी आपल्या आईवडिलांना चहा किंवा सरबत करून दिले आणि त्यांची मुलाखत घेतली. या निमित्ताने निखळ संवाद घडला.

■ **टॅलेंट हंट** - आपल्यात असणाऱ्या कलेच्या माध्यमातून मुले व्यक्त झाली. यामध्ये गायन, कथाकथन, पाककला, चित्रकला, कविता, इतर भाषांमधील कविता, घरगुती खेळ अशा कलांचे दर्शन घडले. यामुळे मुलांच्या सुप्त गुणांना वाव मिळाला.

**विशेष अनुभव -**
शिबिर संपर्कासाठी शाळासंपर्क सुद्धा झाला होता. शिबीर संपल्यानंतर रेणुका स्वरूप

शाळेच्या शिक्षकांनी मुलींच्या आणि पालकांच्या प्रतिक्रिया कळवण्याकरिता फोन केला होता. त्यांच्या शाळेच्या गटावर आपल्या शिबिराबद्दल चर्चा झाली. मुलींना शिबीर खूप आवडले आणि ज्यांनी या शिबिरात भाग घेतला नव्हता त्यांना पुढच्या शिबिरात भाग घ्यायचा आहे असे बाईंनी सांगितले. हे ऐकून आम्हाला खूप आनंद झाला.

**पालकांचा प्रतिसाद -**

आपण हे शिबीर आयोजित करून आमच्या मुलांमध्ये असलेल्या कला गुणांना वाव दिलात व नवीन नवीन गोष्टी, खेळाचे प्रकार, व्यायाम याबाबत मार्गदर्शन केले त्याबद्दल ताई दादांचे खूप खूप आभार. तसेच आपण समाजासाठी जे योगदान देत आहात ते अत्यंत पुरस्करणीय आहे. माझ्या आपणा सर्वांना आपल्या पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा.

*आपलाच*

***- शेखर ना. पोटफोडे***

**कार्यकर्त्यांचे मनोगत -**

आपण नेहमी निवासी शिबीर घेतो. जेवढे कष्ट त्या शिबिरात लागतात तेवढेच याही शिबिरात घ्यावे लागले. सर्वात मोठं आव्हान होतं संपर्काचं. आम्ही ते पुर्ण करू शकलो याचा आनंद वाटला. सगळी सत्रे उत्तम रीतीने घेण्याचा आम्ही पुर्णतः प्रयत्न केला. ही सत्रे मुलांना आवडली. या शिबिरामुळे आम्ही पण तंत्रज्ञानाच्या नवीन गोष्टी शिकलो. वर्धिनीच्या इतिहासातील हे ऑनलाईन शिबीर अविस्मरणीय ठरले.



## स्वामी योगानंद शाखा

योगानंद शाखेच्या ऑनलाईन शिबिरातील सर्व उपक्रम रामकृष्ण व निवेदिता शाखेच्या ऑनलाईन शिबिराप्रमाणेच होते. या शिबिरात देखील सर्वांचा सहभाग उत्तम होता.

**पालकांचे काही विशेष अनुभव -**

नमस्कार, मी शांभवीची आई दीपाली जंगम. 'स्व'-रुपवर्धीनीच्या शिबिरात शांभवी सहभागी झाली होती. शिबिराचे स्वरूप व कार्यक्रम अतिशय छान होते. मी एक आई म्हणून तिला नोकरीमुळे वेळ देऊ शकत नव्हते परंतु लॉकडाऊनच्या काळात या शिबिरामुळे आम्ही मायलेकी फार जवळ आलो. रोजचा योगा, प्रार्थना, बोधकथा, चित्रकला, अभिनय यामध्ये तिने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिबीर ऑनलाईन असूनही सर्व दादा मुलांना प्रोत्साहन देत होते. मला आई म्हणून तिला वेळ देता आला, तिचा आत्मविश्वास वाढताना पाहता आला याचा मला आनंद आहे. या शिबिरातून खऱ्या अर्थाने मुलांचे 'स्व'-रूपवर्धन झाले असे मला वाटते. मी आपल्या सर्वांची आभारी आहे.

धन्यवाद !

***- प्रा. दीपाली जंगम***



## नरवीर तानाजी मालुसरे शाखा


शिबिराची सुरुवात व्यायाम, सूर्यनमस्कार, योगासन यांनी व्हायची. व्यायामानंतर तुकाराम महाराजांचे अभंग, बुद्ध वंदना, समर्थ रामदासांची - पावन भिक्षा ही प्रार्थना घेण्यात आली.

**गायन स्पर्धा -** या स्पर्धेमध्ये सर्वांनी उत्तम प्रतिसाद दिला. यात पद्य, शाळेतील कविता, देशभक्तीपर गीते सादर केली. याशिवाय घरातील वस्तूंचा उपयोग करून जास्ती जास्त उंचीचे पिरॅमिड बनवणे, ओरिगामी, हस्ताक्षर स्पर्धा, व्हिडीओ वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर तयार करणे असे अनेक उपक्रम घेण्यात आले.

या लॉकडाऊनच्या काळात घरातील वातावरण चांगले रहावे यासाठी मुलांनी कुटुंबासोबतचे आनंदाचे क्षण 'Selfie with Family' या उपक्रमांतर्गत कॅमेऱ्यात टिपून ते गटावर पाठवले.

हे शिबीर घेणाऱ्या सर्व युवक दादांचा परिचय व्हिडिओ द्वारे देण्यात आला.

या ऑनलाईन शिबिराच्या माध्यमातून मुलांना व्यायामाचे महत्त्व सांगून त्यांनी नियमित व्यायाम करावा यासाठी आग्रह धरण्यात आला तसेच मुलांना दैनंदिनीचे महत्त्व सांगण्यात आले. ऑनलाईन शिबिरामध्ये मुलांसोबतच पालकांचा सहभाग सुध्दा चांगला होता.



## स्वामी विवेकानंद शाखा

दिवसाची सुरवात सूर्यनमस्कार आणि योगासनाने झाली. गोलात कॉइन किंवा गोटी टाकणे, बोलिंग बॉटल, कपाळावर ग्लास घेऊन चालणे, ग्लासमध्ये चेंडू झेलणे अशा अनेक घरातल्या घरात खेळता येणाऱ्या खेळांचा आस्वाद मुलांनी घेतला. परिचय सत्रात 'रविवार माझ्या आवडीचा' हे गाणं म्हणून त्यासोबत आपला आणि आपल्या पालकांचा परिचय असणारा व्हिडिओ गटावर पाठवला.

मुलांनी त्यांच्या शिक्षकांशी मोबाईलवरून संवाद साधला आणि त्यानंतर त्यांना आपल्या आवडत्या शिक्षकांना पत्र लिहिण्यास सांगितले. बरेच दिवस न भेटणारे विद्यार्थी स्वतःहून फोन करतात याचा शिक्षकांना खूप आनंद वाटला.

मुलांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळावी म्हणून त्यांना अर्धीच कथा सांगून ती पूर्ण करण्यास सांगितले. ‘मुलाखत आपल्या आई-बाबांची’ यातून आपल्या आई-बाबांची स्वप्नं, त्यांचे बालपण, त्यांची आवड, आयुष्यातील चढउतार अशा अनेक गोष्टींमधून पालक आणि मुलांमधले नाते अधिक दृढ होण्यास मदत झाली.

राधानगरी अभयारण्य आणि कास पठार यांची माहिती गटावर पाठवली आणि ‘तुम्ही अनुभवलेला निसर्ग’ या विषयावर निबंध लेखन स्पर्धा घेण्यात आली. ओरिगामी प्रशिक्षण घेण्यात आले. यात मुलांना वृत्तपत्रापासून विविध वस्तू बनवण्यास शिकवल्या. सर्व मुलांनी या उपक्रमाला उत्तम प्रतिसाद दिला. ड्रेस डिझायनिंग मध्ये मुलांनी कागदापासून अतिशय कल्पक ड्रेस बनवले.

काव्य वाचन स्पर्धेत मुलांना कविता तयार करायला सांगितली. सर्वच मुलांनी अत्यंत सुंदर कविता लिहिल्या होत्या.

‘कार बनवणे’ या उपक्रमात मुलांनी घरातील वस्तू वापरून कार तयार केल्या. या सर्व उपक्रमांना शिबिरार्थींनी अतिशय उतम प्रतिसाद दिल्याने शिबीर घेणाऱ्या युवांचा उत्साह वाढला.



## श्रध्दानंद शाखा, क्रांती ज्योती सावित्री शाखा, उत्थान प्रकल्प - महात्मा फुले नगर

शिबिरात रोज योगासने, व्यायाम, व्हिडीओ मेकिंग आणि एडिटिंग, इलेक्ट्रॉनिक वादय वादन, भाषण, चित्रकला, ओरिगामी, पाककला, लेखन कला अशा स्पर्धा आणि प्रेरणा सत्र अशा अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. व्हिडीओ मेकिंग आणि एडिटिंग या सत्राला मुलांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. मुलांनी त्यांच्या कुटुंबाच्या फोटोंचा व्हिडिओ बनवला. इलेक्ट्रॉनिक वादय वादन स्पर्धा यामध्ये पियानो, तबला ही वाद्ये अँपच्या सहाय्याने कशी वाजवता येतात याची माहिती मुलांपर्यंत पोहोचवली. अनेक मुलांनी अशा प्रकारे वाद्य वाजवण्याला उत्तम प्रतिसाद दिला. पाककला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत मुलांनी अनेक पौष्टिक पदार्थ तयार करुन त्यातील पोषक घटक कोणते हे ही सांगितले. चित्रकला स्पर्धेत मुलांनी कोरोनाचे संकट आणि उपाय यावर अतिशय सुंदर चित्रे काढून गटावर पाठवली. ई-फॉर्म चाचणी घेण्यात आली. ‘माझ्या स्वप्नातील गाव’ या विषयावरील निबंध स्पर्धेने शिबिर समारोप करण्यात आला. हे चार दिवसांचे शिबीर पूर्ण झाले तरीही पालक आणि मुलांच्या आग्रहाखातर रोज विविध उपक्रम जसे कथा, पदय, कला मुलांपर्यंत पोहोचवले जातात. यातूनच हे शिबिर यशस्वी झाल्याची पावती मिळते.



## धर्मवीर शंभूराजे शाखा

शाखेच्या या पहिल्या online शिबिरात कृतीसत्रांच्या माध्यमातून मुलांमधील कल्पकता वाढेल यासाठी प्रयत्न केले. त्यामध्ये धान्यापासून कलाकृती, फेस पेंटिंग, वेशभूषा स्पर्धा, परिसर स्वच्छता अशा अनेक उपक्रमांचा समावेश होता. पद्य सत्रामध्ये सहभागी मुलांनी पद्याला चाली लावल्या. रात्र कार्यक्रमात जादूचे प्रयोग, मेहंदी स्पर्धा घेण्यात आली. हे शिबीर सर्व युवकांच्या कायम लक्षात राहील असे झाले. त्यातून शिबिरार्थी आणि पालक शाखेला कायमचे जोडले गेले आहेत.



## स्वामी ब्रम्हानंद शाखा

Online शिबीर घेण्याची शाखेची ही पहिलीच वेळ. सर्व युवकांनी मिळून शिबिराचे नियोजन केले. त्यानुसार चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, उपलब्ध धान्यापासून चित्र काढणे, वस्तुसंकलन, हँगिंग क्राफ्ट, ब्रेड पेंटिंग या उपक्रमांचा समावेश होता. वक्तृत्व स्पर्धेत शिवचरित्र, छ. संभाजी महाराज, माझे स्वप्न, माझी आई हे विषय देण्यात आले आणि सादरीकरणाचे व्हिडिओ मुलांनी शिबीर गटावर पाठवले. शिबिराच्या शेवटच्या दिवशी मुलांकडून शोध बोध लिहून घेतला. शाखेतील युवकांनी 'स्व'-रूपवर्धिनी आणि शाखा याविषयीची माहिती पालकांना दिली.



## स्वामी अभेदानंद शाखा

- **वर्तमानपत्र तयार करणे:-** या सत्रामध्ये मुलांनी स्वत:चे वृत्तपत्र तयार केले.
- **Family Co-Ordination :-** या सत्रामध्ये कुटुंबातील सदस्यांना एका मागे एक उभे राहून समोरच्याच्या पाठीवर कागद ठेवून चित्र काढण्यास सांगितले होते. पहिल्या सदस्यापासून शेवटच्या सदस्यापर्यंत काढलेल्या चित्रात किती समानता दिसते यावर विजेत्यांची घोषणा झाली.
- **2D to 3D :-** या कृतीसत्रामध्ये मुलांनी एखादे चित्र काढून त्याचीच प्रतिकृती बनवायची होती.

टाकाऊ पासून टिकाऊ, मुखवटा तयार करणे, मुकुट बनवणे, रुमालाला बटण लावणे अशा उपक्रमांच्या माध्यमातून मुलांना विविध कौशल्य शिकवण्याचा प्रयत्न केला.

या शिबिराचा अनुभव कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारा ठरला.



## निवेदिता शाखा वर्धापन दिन

१ जून २०२० हा निवेदिता शाखेचा ३२ वा वर्धापन दिन. ह्या वर्षी लॉकडाऊनमुळे वर्धापन दिन ऑनलाईन साजरा झाला. वर्धापनदिनानिमित्त वर्धिकांसाठी विशेष निबंध स्पर्धा आयोजित केली होती, 'भगिनी निवेदितांचे चरित्र मांडणी' या स्पर्धेला वर्धिकांचा खुप छान प्रतिसाद मिळाला. श्री ज्ञानेश पुरंदरे यांच्या प्रेरणादायी व्याख्यानातून मुलींच्या शाखेची गरज युवतींच्या लक्षात आली. याचा पुढील नियोजनास उपयोग झाला. पालकांसाठी बागेश्री दीदींच्या अनुभव कथनाचे आयोजन करण्यात आले. त्यांचे कामातील अतिशय बोलके अनुभव ऐकून पालकांनी उस्फूर्त प्रतिक्रिया दिल्या. याशिवाय हा वर्धापन दिन विशेष ठरला तो तीन पिढ्यांच्या अनुभवांच्या एकत्रित मांडणीने. जुन्या युवती, सध्या काम करणारा युवती गट आणि वर्धिका यांचे शाखा आणि वर्धिनी याविषयी विचार एकत्रित करून त्याचे व्हिडिओ बनवण्यात आले. एकूणच जुन्या नव्याचा संगम या वर्धापन दिनाच्या निमित्ताने घडून आला.

याविषयीचा video नक्की पहा -
https://youtu.be/cRUFlD5stYw

## स्वामी दयानंद सरस्वती शाखा

**शिवराज्याभिषेक दिनानिमित्त श्री. सौरभ महेश करडे यांचे Facebook live व्याख्यान आयोजित करण्यात आले** - त्यांनी शिवरायांच्या पराक्रमाचा इतिहास आणि प्रत्येक लढाईची दूरदृष्टीने केलेली आखणी याची माहिती सांगितली. तसेच जमीन मोजायची जुनी बिगा पद्धत, कर्जाची जिन्नस पद्धत समजावुन सांगितली. बत्तीस मण सुवर्ण सिंहासन व राज्याभिषेक दिन याचे महत्त्व सांगितले. त्यांनी व्याख्यानाची सांगता "रणफंदीची जात आमची" या शौर्यगीताने केली.

## स्वामी विवेकानंद शाखा

स्वामी विवेकानंद शाखेच्या आणि वर्धिनीच्या इतिहासातली **पहिली साप्ताहिक ऑनलाईन शाखा** आज भरली. बरेच दिवसांनी google meet च्या माध्यमातून वर्धक आणि युवक एकत्र आले, त्यामुळे वातावरणात वेगळाच उत्साह होता. शाखेत सुरुवातीला वंदन, त्यानंतर व्यायाम, पद्य, आणि प्रार्थना झाली. पर्यावरण दिनाचे निमित्त साधून हर्षल दादाने 'पर्यावरण आणि त्याचे महत्त्व' या विषयावर वर्धकांशी गप्पा मारल्या. दररोज भरणारी शाखा, दररोज भेटणारे मित्र आता आठवड्यातून एकदा फोनच्या माध्यमातून भेटत असल्याने शाखेविषयी उत्सुकता वाढली. हा प्रयोग इतर शाखांच्या बाबतीत सुद्धा निश्चितच यशस्वी ठरेल याची खात्री वाटते.

## केंद्रीय मैदान विभाग : २१ जून - आंतरराष्ट्रीय योग दिवस

२१ जून हा दिवस जगभरात योग दिवस म्हणून साजरा केला जातो. यावर्षी आपण आंतरराष्ट्रीय योगदिवसानिमित्त सर्व शाखांवर उपक्रम घेतले. त्यामध्ये विविध शारिरीक हलचालींचा वापर करून आपल्या शाखेचे नाव तयार करणे अशी स्पर्धा घेण्यात आली. तसेच एक बैठे, एक उभे राहून आणि एक झोपून अशा तीनही स्थितीतील आसनांचे फोटो वर्धकांनी गटावर पाठवले.

**यामध्ये विजेत्या ठरलेल्या शाखा -**

१) भगिनी निवेदिता शाखा
२) स्वामी दयानंद शाखा
३) समर्थ रामकृष्ण शाखा



## समुपदेशन विभाग

ग्रामीण भागातील शिक्षकांसाठी अगस्त्य फौंडेशनने ऑनलाईन शिबीर घेतले. यात ३५ शिक्षक सहभागी झाले होते. विभाग प्रमुख, सौ मेधा नगरे यांनी 'बदलत्या काळात शिक्षकांची भूमिका' व 'मुलांना समजून घेताना' ह्या विषयांची मांडणी केली. सहभागी शिक्षकांचा प्रतिसाद उत्तम होता.

**समुपदेशन विभागातर्फे सौ. मेघा नगरे यांनी १० वी, १२ वी आणि इतर युवक युवतींसाठी सातत्याने पुढील विषयांची मांडणी केली.**

- वेळापत्रकाचे महत्व
- अभ्यास कसा करावा?
- आहाराचे महत्व
- योग्य करियर निवडतांना
- पालकत्व : संवादाचे महत्व
- विवेकांनंदांचे प्रेरक विचार
- अभ्यास कौशल्ये
- जीवनातील समस्यांचा सामना कसा करावा?
- अपयश ही यशाची पहिली पायरी
- एकाग्रता

## उत्थान - वस्ती विकास प्रकल्प

**ऑनलाईन शिबीर :-**

वस्ती विकास प्रकल्पाचे तीन भागानुसार ऑनलाईन शिबिर झाले. कसबा नगर भागाने समर्थ रामकृष्ण शाखा व भगिनी निवेदिता शाखा यांच्या मदतीने, महात्मा फुले नगर भागाने स्वामी श्रद्धानंद शाखा व क्रांत्रीज्योती सावित्री शाखा यांच्या मदतीने वस्तीतील अनेक मुलामुलींपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला. हे कला शिबीर अत्यंत आगळेवेगळे होते. पाककला, चित्रकला, Electronic वादन कला, व्हिडीओ एडिटिंग कला, लेखन कला, वकृत्व कला, ओरिगामी या वेगवेगळ्या कला शिकविण्यात आल्या. मुलानी या सर्व उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. पालकांनीही या शिबिराला आपुलकीने सहकार्य केले.

लष्कर भवानी नगर या भागाने स्वतंत्रपणे शिबीर घेतले. भागप्रमुख व सर्वच कार्यकर्त्यांनी मिळून सहभागी संख्या मिळवण्यासाठी तसेच शिबीर यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी भरपूर कष्ट घेतले. एकूण १०० मुलामुलींनी या शिबिरात सहभाग घेतला. त्यामुळे या शिबिराच्या माध्यमातून आपण ४० कुटुंबापर्यंत पोहचलो.

ऑनलाईन शिबिरात सध्याच्या परिस्थितीमुळे कंटाळलेल्या मुलांना खूप काही शिकायला मिळालं, व्यक्तिमत्व व संस्कार घडविण्यासाठी ही शिबिरे अत्यंत फलदायी ठरली.

कसबा पेठ भाग ऑनलाईन शिबिरामार्फत अनेक नवीन मुलांपर्यंत पोहचला. त्यांच्या कुटुंबांना फोनद्वारे वर्धिनीची माहिती देऊन त्यांना वेगवेगळ्या उपक्रमांमध्ये जोडून घेतले.

**नियमित उपक्रम :-**

अभ्यासिकानुसार whatsapp गटांवर दर दोन दिवसांमध्ये मुलांना वेगवेगळे उपक्रम देण्यात आले.

**वर्धापन दिन:-**

जून महिन्यामध्ये तीन अभ्यासिकांचे वर्धापन दिन होते.

**प्रियदर्शिनी अभ्यासिका :-**

अभ्यासिकेला १६ जून रोजी दोन वर्ष पूर्ण झाली. अनुजा ताई व अनिल दादा या दोघांनी मिळून प्रियदर्शिनी अभ्यासिका फुलवली. द्वितीय वर्धापन दिनानिमित्त सर्व मुलांचे व पालकांचे अनुभव कथन ठेवण्यात आले होते. दोन वर्ष सातत्याने अभ्यासिकेत येणाऱ्या सिद्धी गुळांबे हिने पहिल्या दिवशीच्या आठवणी ताज्या केल्या. अनुजाताईंनी अभ्यासिकेची जडणघडण कशी केली याबाबत आपले अनुभव सांगितले. अभ्यासिकेचे वेगवेगळे उपक्रम समाजातील अनेक घटकांना प्रेरणादायी ठरतात हे त्यांनी आपल्या अनुभव कथनातून सांगितले.

याविषयीचा video नक्की पहा -
https://youtu.be/JPTfhiBmG2k

**राजमाता जिजाऊ अभ्यासिका :-**

१८ जून रोजी अभ्यासिका नियमित सुरु होऊन १ वर्ष पूर्ण झाले. सुरुवातीला साप्ताहिक व फक्त मुलींसाठी ही अभ्यासिका होती. मागील वर्षापासूनपासून नियमित व मुलामुलींसाठी वैभव भोसले अभ्यासिका घेत आहे.

**मंजुळाबाई चाळ संस्कार वर्ग :-**

११ जून रोजी संस्कार वर्गाचा प्रथम वर्धापन दिन. साप्ताहिक संस्कार वर्गाला एक वर्ष पूर्ण झाले.

**अभ्यासिकाप्रमुख विशेष मार्गदर्शन सत्रे :-**

दि. ३१ मे रोजी **श्री. ज्ञानेश पुरंदरे सरांचे 'कार्यकर्ता कसा असावा'** या विषयावर सत्र झाले. सरांनी उत्तम कार्यकर्त्याची गुणवैशिष्ट्ये सांगितली. लॉकडाउन काळात घडलेल्या अनेक प्रेरणादायी घटना सरांनी सांगितल्या. कठीण काळात व संकट समयी आपण कसे न डगमगता राहावे हे त्यांनी मोजक्या व सुंदर शब्दात सांगितले.

लॉकडाउन नंतर आणखी अनेक समस्या येणार आहेत, त्यावर मात करून आपण आपला **संपर्क कसा विकसित करावा** याविषयी **सुमित डोळे** सरांनी दि. ७ जून रोजी मार्गदर्शन केले. वेगवेगळ्या उदाहरणांमार्फत उत्तम संपर्क म्हणजे काय हे समजावले.

**काव्यमैफिल :-**

या काव्य मैफिलीमध्ये सर्व अभ्यासिका प्रमुखांनी सहभाग घेतला. अभ्यासिका प्रमुखांनी स्वतः रचलेल्या तर काहींनी अनेक मोठमोठ्या कवींच्या कविता सादर केल्या. यातून काव्यरचनेचा सुप्त गुण सर्वांच्या लक्षात आला.



## १० वी पूर्वपीठिका शिबिर

संपूर्ण देशभरात टाळेबंदी असल्याने यावर्षी पूर्वपीठिका शिबिर Online घेण्यात आले. शिबिरात इयत्ता दहावीचे ९० विद्यार्थी उपस्थित होते. दि. ६ जून, ७ जून २०२० या दोन दिवसात हे शिबिर संपन्न झाले.

शिबिराची सुरुवात वर्धिनीचे कार्यवाह श्री. ज्ञानेश पुरंदरे यांच्या प्रेरणादायी व्याख्यानाने झाली.

यानंतरच्या सत्रात आपण अभ्यासाला प्राथमिकता देतो तशीच ती योग्य आहार आणि व्यायामास द्यायला हवी, असे डॉ. विनेश नगरे यांनी सांगितले. आहारात काय असावे, व्यायाम किती वेळ आणि कसा करावा याचे स्पष्टीकरण त्यांनी दिले. सूर्यनमस्कार घालण्याची योग्य पद्धत त्यांनी व्हिडिओच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सांगितली.

श्रीमती उर्मिलाताई गुजर यांची एकूण दोन सत्रे झाली. पहिल्या सत्रात अभ्यास नियोजनासंबंधी मार्गदर्शन दिले. दररोजचे नियोजन, आठवड्याचे आणि महिन्याचे नियोजन केल्यास गुणांमध्ये निश्चित वाढ होते. ते नियोजन कसे करावे यासंदर्भात ताईंनी नमुना दाखवून मार्गदर्शन केले.

दुसऱ्या सत्रात ताईंनी श्रवणकौशल्य कसे विकसित करावे याबाबत सांगितले.

श्रीमती मेघा नगरे यांनी उद्दिष्ट निश्चिती या विषयावर माहिती सांगितली. उद्दिष्ट कसे ठरवावे, त्यासाठी कोणत्या दिशेने विचार करावा त्याचे नियोजन कसे करावे या सगळ्या प्रश्नांची उत्तरे त्यांच्या विवेचनातून मिळाली.

संध्याकाळी डॉ. प्रदीप आगाशे सरांचे प्रेरणासत्र झाले. त्यात त्यांनी उपलब्ध वेळेचा सदुपयोग करून मूलभूत संकल्पना पक्क्या केल्यास त्याचा दहावीसाठी कसा उपयोग होईल याचे विवेचन केले.

ताण न घेता आणि व्यवस्थित नियोजन केल्यास, अभ्यासासाठी आवश्यक कौशल्ये विकसित केल्यास फक्त दहावीच्या वर्षासाठी नव्हे तर पुढील शिक्षण घेताना या मार्गदर्शनाचा लाभ विद्यार्थ्यांना निश्चित होईल.

**खालील विषयांचे मार्गदर्शन झाले.**

- इंग्रजी - श्री. तानाजी जाधव
- विज्ञान - श्रीमती मंजिरी भगत, आणि श्रीमती रोहिणी दिघे
- इतिहास - श्री. श्रीकांत जोशी
- गणित - श्रीमती मनीषा पाठक
- मराठी - श्रीमती दीपाली पवार

शिबिराविषयीच्या प्रतिक्रियांसाठी नेहमीप्रमाणे शोधबोध घेण्यात आला. त्यात विद्यार्थ्यांनी नमूद केले आहे की शिबिराचा उपयोग अभ्यास करताना होईल. यात काही उपयुक्त Video Links, Audio आणि लेखी नोट्स दिलेल्या होत्या. त्याचाही पुढे उपयोग होईल. विद्यार्थी त्यांच्या गरजेप्रमाणे ते Video, Audio पाहू, ऐकू शकतील. यापुढेही अशाच अभ्यास शिबिरांमध्ये सहभागी व्हायला नक्की आवडेल असेही विद्यार्थ्यांनी सांगितले.



१० वी पूर्वपीठिका शिबिर











## पाकोळी बालवाडी

पाकोळी बालवाडी चे online शिबीर ही कल्पना शिक्षकांनी प्रत्यक्षात कृतीत आणली ती हा कोरोनाचा कृपाप्रसाद म्हणून. वाईटातून चांगलं घडलं हे मात्र खरं. मार्चच्या शेवटच्या आठवड्यात बालवाडी बंद करावी लागली पण व्हाट्सअप्प च्या माध्यमातून ती सुरूही होती घराघरांत. या संपर्काने मोठ्या गटाला शिबिराचा निरोप सहजतेने मिळाला आणि पालकांच्या सहकार्याने दि. २८ मे ते ३१ मे दिवसभर चार वेळा वेगवेगळे विषय घेऊन हे शिबीर चांगल्या प्रतिसादात झाले. सुट्टीत जरा उशिराने उठणारी मुलं सकाळी ८ वाजता व्यायामाचा व्हिडिओ बघून व्यायामासाठी उठू लागली. त्यांच्या बरोबर घरातील छोटी भावंडेही सामील होत होती. त्यानंतर ११ वाजता कृतीसत्रात ओरिगामी, जीवन व्यवहार हे विषय झाले. यात कागदाची फुले, गुच्छ, कुत्रा, पंखा बनवणे, कोशिंबीर बनवणे, सरबत बनवणे , मास्क बनवणे अंकांपासून चित्र काढणे हे व्हिडिओ मार्फत शिकवले. दुपारी ४ वाजता अभिनय गीत, बडबडगीते यांचे सादरीकरण झाले. मुलांची नवीन शिकवलेली गाणी पण पाठ झाली. संध्याकाळी ७ वाजता पुष्पाताई, अनघा ताई, छाया ताई, ज्ञानेश पुरंदरे सर यांनी मुलांना वेगवेगळ्या गोष्टी सांगितल्या. पालकांनी या गोष्टी मुलांकडून करून घेतल्या आणि त्यांचे फोटो पाठवून उत्तम प्रतिसाद दिला.
















## स्पर्धा परीक्षा केंद्र :

# "निश्चयाचा महामेरू"



वरील शीर्षक सार्थ ठरवणारे **"मा. अविनाश रंगनाथ घोरपडे"** यांची (P S I) पोलीस उपनिरीक्षक, महाराष्ट्र राज्य पोलीस या पदावर यशस्वी निवड झाली. केवळ जिद्दीच्या जोरावर असाध्यचे साध्य करून दाखवणारं निव्वळ अचाट व्यक्तिमत्त्व.

त्याचं मूळ गाव पुणे जिल्ह्यातील, शिरूर तालुक्यातील तांदळी. घरात आई, वडील व आजी अस छोटंसं कुटुंब. आई अंगणवाडी मदतनीस आणि वडील व आजी शेतमजूर म्हणून काम करणारे. त्यामुळे मिळणाऱ्या उत्पन्नातून केवळ घर खर्चच भागवता येण्यासारखी एकंदर परिस्थिती होती. परंतु शिक्षणाचे महत्त्व ओळखून या माऊलींनी अक्षरशः पोटाला चिमटे काढून वेळ पडेल तेव्हा उसने पैसे, कर्ज घेऊन त्यांचे पदवी पर्यंतचे शिक्षण केले.

कधी शेणखत भरायचे काम असो किंवा कधी ऊस लागवड तर कधी कांदे लागवड, त्यांनी सुध्दा आपल्या आईवडिलांच्या कष्टास कृतज्ञ राहून अगदी लहान वयापासूनच त्यांच्या मोलमजुरीत कोणतीही लाज न बाळगता मदत केली. कष्ट, जिद्द, कृतज्ञता व कोणत्याही चांगल्या गोष्टींची लाज न बाळगणे, हे बाळकडू त्यांना त्यांच्या घरातूनच मिळाले. या कठोर परिश्रमातून त्यांनी E & TC शाखेतून अभियांत्रिकीची पदवी मिळवली. घरची आर्थिक परिस्थिती बदलण्यासाठी त्यांनी एका महाविद्यालयात व्याख्याता (lecturer) म्हणून काम करायला सुरुवात केली.

सलग तीन वर्षे हे काम करतांना सर्व काही सुरळीत चालले होते, आर्थिक प्रश्नाचा गुंता सुटत होता, मात्र त्यांचे त्याच कामात मन रमत नव्हते.

या वाटचालीत त्यांना अनेक चांगले वाईट अनुभव आले होते. त्यामुळे समाजाप्रती असलेल्या आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून अधिकारी होण्याचे त्यांनी ठरवले. २०१६ मध्ये आपली व्याख्याता पदाची नोकरी सोडून दिली आणि त्याच वर्षापासून अभ्यासाला सुरुवात केली.

आता पुढे तर खरी गंमत होती, हाती असलेली नोकरी सोडून पुन्हा अभ्यास करावा लागणार होता. घरातील आर्थिक परिस्थिती पुन्हा तिचा मूळ अवतार धारण करणार होती. ज्यासाठी हे धनुष्य हाती घेतले होते, तोच समाज पुन्हा सुशिक्षित बेरोजगार म्हणून हिणवणार होता. परंतु हार न मानता ते पुन्हा विद्यार्थीदशेत आले. आलेल्या संकटावर मात करण्यासाठी, हाती घेतलेल्या धनुष्याबरोबर सोबतीला होता जुना भाता. त्या भात्यात होती कष्ट, चिकाटी, सातत्य, कृतज्ञता नावाची शस्त्रं.

तयारीसाठी पुण्यात आल्यानंतर 'स्व' - रुपवर्धिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्राच्या शिष्यवृत्ती बॅचला त्यांना प्रवेश मिळाला. कालांतराने अभ्यासिकेत संस्थेच्या कमवा व शिका योजनेंतर्गत अभ्यासिका समन्वयक म्हणूनही त्यांना संधी मिळाली. त्यातून महिन्याच्या पुस्तकांची व तसेच इतर खर्चाची गरज भागू लागली.

२०१६ साली पहिल्याच प्रयत्नांत PSI पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षेला पास होऊनही काही गुणांनी मुलाखतीची संधी हुकली. पुढच्या वर्षी २०१७ साली पुन्हा PSI मुख्य परीक्षा देऊन गेल्या वर्षाची परत एकदा पुनरावृत्ती झाली. नक्कीच काही तरी चुकत असणार असे म्हणत त्यांनी आत्मपरीक्षण करण्यास सुरुवात केली, "A certain darkness is needed to see the stars"- या ओशोच्या उक्तीनुसार आलेल्या निराशेला आशेमध्ये परिवर्तित करण्यासाठी पुन्हा एकदा अविनाश सर तयार झाले आणि २०१८ साली PSI पूर्व व मुख्य परीक्षेत २०० पैकी १२५ गुणांनी पास होत शारीरिक चाचणी व मुलाखतीची संधी मिळवली. त्यासाठी वर्षभर शारीरिक तयारी करताना त्यांची कठोर शिस्त जाणवायची. कठोर शिस्तीच्या कोंदणातच यशाचा हिरा चमकतो असे म्हणतात हा अगदी तसाच प्रकार होता.

या परिक्षेबरोबर नियतीने पण त्यांची कठोर परीक्षा घेतली. शारीरिक चाचणी अगदीच दीड ते दोन महिन्यावर आली होती. रोजच्या तयारीत १०० पैकी १०० गुण मिळत होते. एक दिवस रात्री नेहमीप्रमाणे घरी जात असताना सरांच्या सायकलला एका अज्ञात चार चाकी वाहनाने मागून जोराची धडक दिली.

डाव्या हाताच्या मनगटाला गंभीर जखम होऊन ते मोडले होते. त्याचे ऑपरेशन करावे लागले. डॉक्टरांनी किमान तीन महिने सक्तीची विश्रांती घ्यायला लावली त्याशिवाय पुन्हा डावा हात पूर्वीसारखा होणार नाही म्हणून सांगितल.

सरांच्या सहकाऱ्यांनी विश्रांती घेण्याचा सल्ला दिला. पुढच्या वेळेस पुन्हा प्रयत्न कर म्हणून सांगितले. मात्र आत्ता नाही तर परत कधीच नाही म्हणत सरांनी सर्व शक्तीनिशी याही परिस्थितीशी दोन हात करण्याचे ठरवले.

अपघातानंतरचा मैदानावरचा पहिला दिवस अविस्मरणीय होता. डावा हात जपत जपत, शरीराची योग्य काळजी घेत त्यांनी सरावाला सुरुवात केली. हळूहळू योग्य आहार, विश्रांती आणि तयारीच्या जोरावर पुन्हा एकदा सरावात रंगत येऊ लागली. जखमी, मोडलेल्या डाव्या हाताने ८ पूलअप्स काढायचे होते हळूहळू तेही जमू लागले. यात जास्तीत जास्त गुण मिळवणे महत्वाचे व गरजेचे होते कारण तेच गुण अंतिम क्षणी निर्णायक ठरणार होते. तयारी करून घेणाऱ्या सरांना त्यांच्या जिद्दीचे नवल वाटत होते.

शेवटी शारीरिक चाचणी व मुलाखतीची तारीख जाहीर झाली ९ जानेवारी २०२०. एकाच दिवशी दोन्ही चाचण्या होणार होत्या. पहाटे शारीरिक व नंतर लगेच मुलाखत होती. सरांनी त्यादिवशी असीम साहस आणि धैर्याचे प्रदर्शन घडवून शारिरीक चाचणीत १०० पैकी सुमारे ९५ गुण मिळवले आणि मुलाखत सुद्धा चांगली झाली. आता फक्त अंतिम निकालाची वाट पहावी लागणार होती.

अंदाजे दोन महिन्याने १७ मार्च २०२० रोजी निकाल हाती येणार होता. आज अविनाश सरांसोबतच त्यांचे आईवडिल, विशेषतः बहिण व दाजींनी, शिक्षकपालक संस्था 'स्व'-रूपवर्धिनी यांनी घेतलेल्या कष्टाचे फळ आज मिळणार होते.

शेवटी दुपारी अडीच वाजता आयोगाचा निकाल जाहीर झाला आणि त्यांची PSI, पोलीस उपनिरीक्षक महाराष्ट्र राज्य पदी यशस्वी निवड झाल्याची गोड वार्ता मिळाली.

आपणांस पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा.

***शब्दांकन : दिपक वारे***
*(अभ्यासिका समन्वयक)*

## आत्मविश्वासाचे फळ



मी पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील बेलसर गावची. १० वी पर्यंतच माझं शिक्षण गावतच झालं. त्यानंतर १२ वी ला सासवड आणि मुधोजी कॉलेज फलटण मधून B A B ed, M A पर्यंत शिकले. शिकत असतानाच लग्न झाले. घरच्या जबाबदाऱ्या सांभाळून शिक्षण पूर्ण केले. आयुष्यात काही प्रसंग माणसाला पूर्ण निराश करतात. असेच माझेही झाले. मी सासर सोडून कायमची माहेरी आले. या कठीण काळात माझ्या आई-वडिलांनी, भावंडांनी खूप चांगली साथ दिली. त्यांच्या प्रोत्साहनाने मी स्पर्धा परिक्षेचा मार्ग निवडला आणि २०१४ ला पुण्यात आले. ' स्व' -रुपवर्धिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्राची, शिष्यवृत्ती वर्गाची माहिती मिळाली होती. वर्गाची परीक्षा दिली, निवड झाली आणि माझा अभ्यास सुरू झाला. रोजच्या मार्गदर्शनातून अभ्यासाचा आवाका किती मोठा आहे ते समजले. PSI पदाची परीक्षा हेच ध्येय ठरवून अभ्यासाचे नियोजन आखले. काहीवेळा भूतकाळातील आठवणी मला परत मागे नेत, अशावेळी मनीषा ताई, वर्गातील मित्र-मैत्रिणी यांचा आधार मला परत मूळपदावर आणे. २०१७ च्या पूर्व परीक्षेला वेळेचं नियोजन नीट न झाल्याने अपयश आले. पण मनाने हार मानली नव्हती आणि मोठ्या चिकाटीने २०१८ ची पूर्व परीक्षा मी पास झाले. पहिला टप्पा पूर्ण केला. पुढचा टप्पा खरंतर खूप अवघड. पण मेहनतीवर खूप विश्वास होता. अभ्यासाचे योग्य नियोजन करून आयोगाच्या मागील प्रश्नांचं स्वरूप समजून घेऊन अभ्यासाला लागले. या कष्टाचे उत्तम चीज झाले. २०१८ ची मुख्य परीक्षा ९७ गुण मिळवून मी पास झाले. सगळ्यांनाच खूप आनंद झाला. तिसरा टप्पा फिजिकल आणि मुलाखत हा बाकी होता. मैदानावरील सराव अवघड गेला कारण मैदानाशी कमी संबंध. पण मनाला बजावत होते, मी शेतकऱ्याची काटक आणि कणखर मुलगी आहे. ही परीक्षा हरायची नाही. एक दिवस मैदानावर सराव करताना पायाला दुखापत झाली आणि तीन महिन्यांसाठी मैदानावरील सराव बंद झाला. या हाती आलेल्या वेळेमध्ये सकारात्मकतेने मुलाखतीचा कसून अभ्यास केला. रयत प्रबोधिनीच्या श्री उमेश कुदळे सरांनी मुलाखतीची चांगली तयारी करून घेतली. तीन महिन्यांनंतर डॉक्टरांच्या सल्ल्याने मैदान सुरू केले. दुखऱ्या पायाकडे दुर्लक्ष करून सराव चालूच ठेवला. आमच्या बॅचचे सुदैव की दुर्दैव, या दोन्ही परीक्षा १६ जानेवारी २०२० ला झाल्या. मैदानात सरावाला मिळालेला वेळ, 'स्व'-रुपवर्धिनीत मुलाखतींसाठी झालेले वैयक्तिक मार्गदर्शन यांचा मला खूप फायदा झाला आणि १ मार्च २०२० ला मला माझ्या कष्टाचे फळ मिळालं. मी OBC गटात २१३ गुण मिळवून महाराष्ट्रात ५ वी आले. या दिवसाने सगळ्यांच्या डोळ्यात आंनदाश्रू उभे राहिले. या परीक्षेतून, अभ्यासातून माझे विशेष शिक्षण झाले. मला वाटतं, स्वतःवरील विश्वास, अभ्यासाचे योग्य नियोजन, सातत्य, जिद्द, चिकाटी व संयम या गोष्टींमुळे यश तुम्हाला कधीच हुलकावणी देणार नाही.

***- सुप्रिया शिवाजी जगताप***

---

## वाळूचे कण रगडिता...



माझे मूळ गाव राजूर, नगर जिल्ह्यातील अकोला तालुका. B . A . पर्यंतचे शिक्षण गावात झाले. M.A. करायला पुण्यातील स.प. महाविद्यालयात दाखल झालो. M. A. झाल्यावर परत घरी गेलो.कारण पुढची दिशा निश्चित ठरत नव्हती. व्यवसाय करायचा होता पण आर्थिक प्रश्न मोठा होता. वर्तमानपत्रात येणाऱ्या नगरच्या पोलीस अधीक्षकांची, श्रीकृष्ण प्रकाश यांची दमदार कारकीर्द वाचून पोलीस खात्यात काम करायची प्रेरणा मिळाली.ह्या प्रेरणेने पोलीस शिपाई भरतीसाठी दोन वेळा प्रयत्न केला पण मैदानावरील आत्मविश्वास कमी पडला आणि निवड होऊ शकली नाही. माझा कॉलेज मधील मित्र पुण्यात P S I परिक्षेची तयारी करत होता. त्याच्या बरोबर राहून कोणताही क्लास न लावता २०१५ मध्ये पूर्व परीक्षा दिली. पण मुख्य परीक्षेसाठी अभ्यास कमी पडल्याने कमी गुण मिळाले. नंतर खचून न जाता अभ्यासाबरोबर मैदानाचा सर्व सुरू केला. तिथे सचिन कदम शी ओळख झाली आणि त्याच्या सांगण्यावरून वर्धिनीच्या अभ्यासिकेत प्रवेश घेतला. शिष्यवृत्ती परीक्षा दिली. त्यात निवड झाल्याने मोफत मार्गदर्शन व अभ्यासिका याचा लाभ झाला. लेखी परिक्षे बरोबर मुलाखतीची पण तयारी उत्तम झाल्याने २०१८ च्या PSI पदासाठीच्या अंतिम यादीत माझी निवड झाली. माझे स्वप्न साकार झालं. माझ्या या यशाचे श्रेय 'स्व'-रुपवर्धिनीच्या स्पर्धा परिक्षा केंद्रात मिळालेल्या मार्गदर्शनाला आहे. येथे अभ्यासाबरोबर सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून माणसाने कसे जगावे याचेही शिक्षण मिळाले. कोणतीही अपेक्षा न ठेवता स्वच्छ मनाने काम करीत राहिल्याने आयुष्यात मार्ग सापडत जातात हे केंद्रात होणाऱ्या उपक्रमातून लक्षात आले. आधी आलेल्या अपयशाकडे बघताना मी सतत मनाला बजावत होतो की समस्यांचे भांडवल न करता ज्ञानाचे भांडवल जमवत रहा त्यातूनच यशाचा मार्ग सापडणार आहे. आणि त्यामुळेच मी हे यश मिळवू शकलो.

***- संतोष बाळू देशमुख***

---

## राज्य सेवा 2019 परिक्षेमधून खालील विद्यार्थ्यांची निवड झाली. सर्वांचे हार्दिक अभिनंदन.

- प्रदीप शेंडगे - गटविकास अधिकारी
- कावेरी कदम - कक्ष अधिकारी
- शुभम घुगे - कक्ष अधिकारी
- गणेश मंडलिक - भूमी अभिलेख उपनिबंधक
- अभिजित हजारे - नायब तहसीलदार

## आमचे युवक... आमची ताकद...



फोनची रिंग वाजली. समोरून आवाज "दादा आमच्या वस्तीत २० कुटुंबांना धान्याची गरज आहे" लगेच दुसरा फोन "दादा धान्याची गाडी कुठपर्यंत पोहोचली आहे?"

तेवढ्यात मागून कुणीतरी हाक देतं "दादा इथलं वाटप झालं आहे, आता काय करू?" या सादेला दादाचा प्रतिसाद " चला कार्यकर्ते ही मोहीम फत्ते झाली. आता पुढची वाटचाल सुरु", असा दमदार प्रतिसाद देणारा वर्धिनीचा युवा कार्यकर्ता राज जाधव. वर्धिनीच्या बालवाडीचा विद्यार्थी, समर्थ रामकृष्ण शाखेचा वर्धक आणि आता भागाचा युवा विभाग प्रमुख.

सतत हसतमुख आणि उत्साही व्यक्तिमत्व. युवा गटात आल्यावर तासिका प्रमुख, कार्यक्रम प्रमुख, शाखा प्रमुख, शिबिरात भोजन प्रमुख, भांडार प्रमुख, वर्धिनीच्या गणेशोत्सव मध्ये वादन प्रमुख अशा अनेक जबाबदाऱ्या राजने पार पडल्या. राज दादाचे पूर्ण कुटुंब म्हणजे वर्धिनीचं हक्काचं घर. B.sc चे शिक्षण एस. पी कॉलेज मधून पूर्ण करून लुपिन या कंपनीत कार्यरत आहे. यासोबतच वर्धिनीच्या पेठ भागातील शाखांचा भाग युवा प्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळत आहे.

कोरोनाच्या या संकट काळात वर्धिनीच्या धान्य वाटप केंद्राचा प्रमुख म्हणून अतिशय जबाबदारीने राजने काम पूर्ण केले. जवळपास १५०० गरजू कुटुंबांची माहिती शाखा युवांच्या मदतीने एकत्रित करणे, त्यानुसार वाटपाच्या रचना लावणे, कोणत्याही नियमाचे उल्लंघन न होता योग्य त्या व्यक्तीपर्यंत मदत पोहोचवणे यात वर्धिनीला यश मिळाले. या सर्व मोहिमेत राज सोबत रामकृष्ण शाखेच्या युवकांनी उत्तम कामगिरी बजावली.

---

## *कार्यकर्तापण काय असतं ?*

- सळसळणारं चैतन्य म्हणजे कार्यकर्तापण !
- अमाप, अपूर्व उत्साह म्हणजे कार्यकर्तापण !
- कामाची प्रचंड ओढ म्हणजे कार्यकर्तापण !
- स्वत:पेक्षा कामाचाच अधिक विचार म्हणजे कार्यकर्तापण !
- वेळ पडली तर तानाजीसारखं घरचं लग्न सोडून कोंढाण्याकडे धावणं म्हणजे कार्यकर्तापण !
- संघटनेसाठी सर्वस्व अर्पण म्हणजे कार्यकर्तापण !

***शिवरायांविषयी समर्थ म्हणतात,***

***सकल सुखांचा केला त्याग । म्हणोनि साधिजे तो योग ।। राज्यसाधनेची लगबग । कैसी केली ।।***

अशी लगबग करतात ते कार्यकर्ते !

वर्धिनीत असं कार्यकर्तेपण जोपासलं जावं यासाठी यत्न करूयात.

वयाच्या साठीनंतर ज्यांनी आपल्यासाठी अपार कष्ट घेऊन वर्धिनी वाढवली, शेकडो गरीब मुला-मुलींच्या शिक्षणाची सोय केली,त्यांच्या हृदयात राष्ट्रभक्ती प्रज्वलित केली, कणाकणाने झिजून वयाच्या पंचाऐंशीव्या वर्षी ही वर्धिनी आपल्या हातात देऊन अखेरचा श्वास सोडला, त्या ऋषितुल्य किशाभाऊंचे वारस होऊयात.

**- ज्ञानेश पुरंदरे**

---

## विचारधन

**शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे ।**
**साधवो न हि सर्वत्र चंदनं न वने वने ।।**

प्रत्येक पर्वतावर माणिक नावाचे रत्न आढळत नाही. प्रत्येक हत्तीच्या गंडस्थळात मोती असत नाहीत. संत महात्मे सर्वत्र असत नाहीत. प्रत्येक वनात चंदन वृक्ष गवसत नाही.

**तात्पर्य -** नि:स्वार्थीपणे काम करणारी चांगली माणसे खरंच दुर्मिळ असतात. आपल्याला अशा माणसांचा सहवास मिळतो हे आपले भाग्यच आहे.

# सूर्यग्रहण

कंकणाकृती सूर्यग्रहण २१ जून २०२० रोजी झाले. भारताच्या काही भागांतून ते दिसले. पुण्यातून खंडग्रास सूर्यग्रहण दिसणार होते. आधीच पावसाळा, त्यात लॉकडाऊन. त्यामुळे आपापल्या घरातूनच हे ग्रहण पहावे लागणार होते. ग्रहण म्हटले की आपल्या समाजात अंधश्रद्धा आहेतच. खगोलप्रेमी आणि शिक्षकांसाठी ही नामी संधी होती. समाजातील अंधश्रद्धा दूर सारून सर्वांनी सूर्यग्रहण पहावे आणि काही सोपे प्रयोग या निमित्ताने करावेत यासाठी मार्गदर्शन करण्याची संधी वर्धिनीच्या फिरत्या प्रयोग शाळेचे श्री. सुनील कुलकर्णी सरांनी उपलब्ध करून दिली. त्यांनी अत्यंत सोप्या भाषेत ग्रहण कसे होते, सूर्यग्रहण पाहताना घ्यावयाची काळजी तसेच काही प्रयोग यांची प्रात्यक्षिके व्हिडिओच्या माध्यमातून दाखवली. या व्हिडिओला इतकी प्रसिद्धी मिळाली की राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्यामार्फत दररोज अभ्यासाच्या लिंक्स दिल्या जातात त्यात सरांच्या या लिंकचा समावेश केला. जास्तीतजास्त विद्यार्थी आणि पालकांपर्यंत हा व्हिडिओ पोहोचला. केंद्रीय तासिका समूहात आदल्या दिवशी हा व्हिडिओ आणि सूर्यग्रहण संबंधित वेळांचे तपशील आणि आकृतीसहीत माहिती प्रत्येक शाखेच्या गटांवर पोस्ट झाली. अनेक वर्धक, वर्धिका, युवक आणि युवतींनी ग्रहण पाहण्याचा आनंद लुटला. संध्याकाळी ग्रहणाचे फोटो पोस्ट व्हायला लागले. कुलकर्णी सरांनी मार्गदर्शन केल्यानुसार योग्य काळजी घेऊन वर्धकांनी ग्रहण पाहिले. स्वामी ब्रह्मानंद शाखेच्या निखिल साबळे याचा अनुभव प्रेरणादायी आहे. केवळ अंधश्रद्धा दूर व्हाव्यात यासाठी तो स्वतः तीन तास उभा राहून आपल्या लहान भावंडांसोबत ग्रहण पहात होता. ग्रहणाचे फोटो काढत होता. अनेकांनी सूर्यग्रहण याची देही याची डोळा पाहण्याचा आनंद अनुभवला.

**प्रतिसाद -**

या ग्रहणाच्या आधी मी चंद्रग्रहण पाहिलं होतं. ते पाहण्यासाठी शाळेने सहल नेली होती पण यावेळचे ग्रहण मी कुटुंबासोबत पाहिलं आणि माझ्यासाठी सर्वात मोठा आनंद म्हणजे हे ग्रहण मी माझ्या लहान भावंडांनाही दाखवलं कारण त्यांनी अंधश्रद्धांवर विश्वास ठेऊ नये म्हणून. हे ग्रहण अविस्मरणीय यासाठी की त्याचे फोटो काढण्यासाठी मी तीन तास उभा होतो.

***- निखिल साबळे***

*(स्वामी ब्रह्मानंद शाखा)*



# काव्यसुमने

## रक्त आपुल्या प्रिय आईचे...

बर्फाचे तट पेटूनि उठले सदन शिवाचे कोसळले
रक्त आपुल्या प्रिय आईचे शुभ्र हिमावर ओघळते !

असुरांचे पद भ्रष्ट लागुनि आज सतींचे पुण्य मळे
अशा घडीला कोण करंटा तटस्थतेने दूर पळे ?
कृतांत ज्वाला त्वेषाची ना कोणाच्या हृदयात जळे
साममंत्र तो सरे, रणाची नौबत आता धडधडते !
रक्त आपुल्या प्रिय आईचे शुभ्र हिमावर ओघळते !

सह्यगिरीतील वनराजांनो, या कुहरांतुनि आज पुढे
रक्त हवे जर स्वतंत्रतेला रक्ताचे पडतील सडे
एक हिमाचल राखायास्तव करा हिमाचल लक्ष खडे
समरपुराचे वारकरी हो, समरदेवता बोलविते!
रक्त आपुल्या प्रिय आईचे शुभ्र हिमावर ओघळते!

खडक काजळी घोटुनि तुमचे मनगट-बाहू घडलेले
कडेकपारीमधील वणवे उरांत तुमच्या दडलेले
काबुल-कंदाहार पथावर डंके तुमचे झडलेले
शिवतेजाची दीपमाळ पाठीशी अपुल्या पाजळते !
रक्त आपुल्या प्रिय आईचे शुभ्र हिमावर ओघळते !

कोटी कोटी असतील शरीरे- मनगट अमुचे एक असे
कोटी कोटी देहात आजला एक मनीषा जागतसे
पिवळे जहरी सर्प ठेचणे अन्य मना व्यवधान नसे
एक प्रतिज्ञा, विजय मिळेतो राहील रण हे धगधगते !
रक्त आपुल्या प्रिय आईचे शुभ्र हिमावर ओघळते !

✍ ***कुसुमाग्रज***

वंदनीय कुसुमाग्रज यांनी १९६२ च्या भारत-चीन युध्दा समयी केलेली ही कविता. आपल्यापैकी अनेकांचा तर तेंव्हा जन्मही झाला नव्हता. मात्र आजही हे शब्द वाचून डोळ्यांत अश्रू, रक्तात सळसळ, मनी देशप्रेम आणि हृदयी आमच्या वीर जवानांप्रती अभिमान प्रकट होतो !!

## एक कविता मित्रांसाठी

शाळेच्या वाटेवर अखंड खिदळणारा
मागच्या बाकांवर अचकट-विचकट बोलणारा
शनिवारवाड्याच्या बुरजावर अभ्यासाचं नाटक करणारा
तुमच्यासाठी नेहमीच कोणाशीही पंगा घेणारा मित्र

भीमनगरातल्या झोपडीत गुळाचा चहा पाजणारा
कागदीपुऱ्यात मायेनं शीरखुरमा खिलवणारा
एकाच परातीत सर्वांचा दिवाळीचा फराळ मांडणारा
फाटकाच, पण थोडा बरा शर्ट मित्राला देणारा
झिंगलेल्या बापाला अबोल मायेनं घरी नेणारा
मनातलं दुःख लपवून हसऱ्या चेहऱ्यानं वावरणारा मित्र

खोखोच्या खुंटावर गरकन् फिरणारा
कबड्डीच्या साखळीत मजबूत हात धरणारा
फुटबॉलच्या मैदानावर अचूक पास हेरणारा
चिर चिर घोडीत अंगावर धपकन् बसणारा
चुकार रानवाटांवर सोबतीनं हिंडणारा
दोस्तीच्या आणाभाका नेहमी देत राहणारा आणि मित्र

सिलिकॉन व्हॅलीत वसलेला
कॉर्पोरेट जगतात हरवलेला
सरकारी फायलींत अडकलेला
शिक्षकी पेक्षात गुरफटलेला
स्वतःच्याच संसारात रमलेला
तरी दोस्तीसाठी आसुसलेला

✍ ***प्रा. डॉ. संजय तांबट***

## श्रद्धांजली

■ स्व. किशाभाऊंचे निकटवर्तीय सहकारी आणि वर्धिनीचे भूतपूर्व कार्याध्यक्ष श्री कल्याण वर्दे यांचे दुःखद निधन झाले.
विविध सामाजिक, शैक्षणिक संस्थांचे ते आधारस्तंभ होते. रोटरी इंटरनॅशनलचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर म्हणूनही त्यांनी काम पाहिले होते. आपण लोकशाहीत राहतो म्हणजे नेमकं काय आणि आपल्याला नेमकी कशी लोकशाही हवी आहे त्यासाठी तरुणांनी काय करायला हवं या विषयी वर्दे सर कार्यकर्त्यांशी अनेकदा बोलत असत. या विचारातून वर्धिनीने एक राज्यस्तरीय युवा अधिवेशन आयोजित केले होते. अधिवेशनाच्या यशस्वीतेसाठी लागणाऱ्या सर्व व्यवस्था त्यांनी त्यांच्या प्रचंड लोकसंग्रहाच्या बळावर उभ्या केल्या. खेळ, नाटक, प्रवास-फोटोग्राफी, लेखन-वाचन अश्या अनेक क्षेत्रात वर्दे सरांनी आपल्या कर्तृत्वाची छाप उमटवली होती.

■ श्रीमती लीलाताई पाटील यांचे वयाच्या ८० व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांनी कोल्हापूर येथे सुरू केलेल्या 'सृजन आनंद' या शाळेकडे महाराष्ट्रातील प्रयोगशील, उपक्रमशील, आणि सर्जनशील शाळा म्हणून बघितले जाते.

■ वर्धिनीच्या १९९२ बॅचमधील विद्यार्थिनी श्रीमती गीतांजली गुंजाळ यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून त्यांनी शिक्षण घेतले होते.

■ वर्धिनीच्या हितचिंतक, भगवतभक्तीत सदैव लीन असणाऱ्या, कीर्तनकार, सर्वांना नेहेमी सहकार्य करणाऱ्या आदर्श उद्योजिका, समर्थभक्त श्रीमती सईताई मोने (मोने काकू) यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले.

■ वर्धिनीच्या युवा गटाचे मार्गदर्शक आणि सुप्रसिद्ध व्याख्याते श्री. मंदार परळीकर यांचे वडील जेष्ठ संघ कार्यकर्ते श्री. लक्ष्मणराव परळीकर यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.

**ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो.**

**।। भावपूर्ण श्रद्धांजली ।।**

## विशेष वृत्त

■ पहिल्या आणि दुसऱ्या लॉक डाऊनच्या काळात वर्धिनीच्या कार्यकर्त्यांनी पुण्याच्या पूर्व भागातील वस्त्यांमध्ये डॉक्टरांच्या खांद्याला खांदा लावून काम केले. कोरोना संक्रमणाचा धोका असतानाही संपूर्ण काळजी घेऊन, PPE किट परिधान करून वस्तीतील घराघरापर्यंत पोहोचून Mission Screening पूर्ण केले. पुढील टप्प्यात 'स्व'-रूपवर्धिनीच्या वास्तूत आणि श्रमिक नगर येथे आरोग्य केंद्राचे संयोजन करून गरजू रुग्णांची तपासणी करून त्यांना निःशुल्क औषधे देण्यात आली.

■ लॉक डाऊन शिथिल होण्याच्या टप्प्यावर आता युवा विभागाच्या वतीने विशेष अभियान राबविण्यात येत आहे. यात ज्यांना नोकरी-व्यवसायाबाबत समस्या निर्माण झाल्या आहेत अशांची माहिती संकलित करून त्यांना विविध उपयुक्त स्रोतांशी जोडून दिले जात आहे. या योजनेचा लाभ मिळवण्यासाठी कृपया खालील Google form भरावा.
https://forms.gle/ct3Rc5k6riPntUtA9

■ #Black Lives Matter
या शिर्षकांतर्गत आयोजित 'जगातील वर्णद्वेष - उत्पत्ति, समस्या आणि आव्हाने' या आंतरराष्ट्रीय वेबिनारच्या आयोजनामध्ये वर्धिनीचे सहकार्याध्यक्ष डॉ. संजय तांबट यांनी संयोजक या नात्याने महत्वपूर्ण भूमिका बजावली. हार्दिक अभिनंदन.

■ लॉक डाऊन सुरू झाल्यापासून IISER संस्थेच्या शिबिरासाठी निवडल्या गेलेल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी विज्ञानाच्या संकल्पना व प्रात्यक्षिकांचे ऑनलाइन प्रशिक्षण वर्धिनीच्या फिरती विज्ञान-तंत्रज्ञान प्रयोगशाळा उपक्रमातील तज्ज्ञांद्वारा प्रतिदिन चालू आहे.